

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – सहावी (17 जून) विषय – मराठी Subscribe

## शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

**मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट**

टेस्ट सोडवा

- स्वाध्याय सराव करा व टेस्ट सोडवा.

**आपण समजून घेऊया.**

### नाम

माधव आणि सरिता शाळेत निघाले. सरिताने पाण्याची बाटली दप्तरात ठेवली अन् मांजराला टाटा करून ती निघाली.

वरील उदाहरणात माधव, सरिता ही व्यक्तींची नावे आली आहेत. पाणी हे द्रवाचे नाव आहे, तर बाटली, दप्तर ही वस्तूंची नावे आहेत. मांजर हे प्राण्याचे नाव आहे. या नावांना नाम म्हणतात.

आपण वस्तू हा शब्द डोळ्याने दिसणाऱ्या, कल्पनेने जाणणाऱ्या पदार्थाला किंवा त्यांच्या गुणधर्मांना उद्देशून वापरतो. वस्तू या शब्दाच्या अर्थामध्ये सर्व प्रकारचे पदार्थ, प्राणी व त्याच्या अंगी असणारे गुणधर्म यांचा अंतर्भाव होतो.

- खालील वाक्यांतील अधोरेखित केलेली नामे वाचा व समजून घ्या.

(अ) <u>शब्बीर</u> खाली बसला.

(आ) <u>पाऊस</u> कमी झाला.

(इ) तो <u>शाळेत</u> येऊन <u>सुरवाडेगुरुजींना</u> म्हणाला.

(ई) <u>पाकिटात</u> <u>पैसे</u> नव्हते.

(उ) <u>मुले</u> <u>बागेतील</u> <u>फुलेफळे</u> जपू लागली.

(ऊ) <u>कविता</u> <u>राऊतमुळे</u> <u>हरसूलपाड्याला</u> <u>आनंद</u> झाला.

(शब्बीर, पाऊस, शाळा, सुरवाडेगुरुजी, पाकीट, पैसे, मुले, बाग, फुलेफळे, कविता, राऊत, हरसूलपाडा, आनंद ही नामे आहेत.)

- वरीलप्रमाणे नामे वापरून पाच वाक्ये लिहा.
- या पाठातील नामांची यादी करा.
- व्यक्ती, प्राणी, पक्षी, कीटक, वस्तू, पदार्थ, फळे, फुले, गावे, नद्या, गुण या प्रत्येक प्रकाराची दहा नावे गटात चर्चा करून लिहा.

**खेळ खेळूया.**

वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटाने नाव सांगावे. सांगितलेल्या नावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे नाव दुसऱ्या गटाने सांगावे. अशा पद्धतीने नावांच्या भेंड्यांचा खेळ खेळावा.

उदा., माधव → वजन → नमिता → तारीख → खाऊ → ऊस → सर्कस....

## सराव कर.

टेस्ट सोडवा

### उदाहरणसंग्रह 8

बेरीज करा.

(1) 42,311 + 65,36,624
(2) 3,17,529 + 8,04,613
(3) 12,42,746 + 4,83,748
(4) 24,12,636 + 23,19,058
(5) 2,654 + 71,209 + 5,03,789
(6) 29 + 726 + 51,36,274
(7) 14,02,649 + 524 + 28,13,749
(8) 23,45,678 + 9,87,654
(9) 22 + 6,047 + 3,84,527
(10) 2,345 + 65,432 + 76,54,369

पुढील शाब्दिक उदाहरण अभ्यासा.

✦ पोलिओ निर्मूलनाच्या अभियानामध्ये 2012 साली एका जिल्ह्यात 3,17,658 बालकांना व दुसऱ्या जिल्ह्यात 2,04,969 बालकांना पोलिओ डोस देण्यात आले, तर एकूण किती बालकांना पोलिओ डोस देण्यात आले ?

```
  3 1 7 6 5 8
+ 2 0 4 9 6 9
-------------
  5 2 2 6 2 7
```

एकूण 5,22,627 बालकांना पोलिओ डोस देण्यात आले.

### उदाहरणसंग्रह 9

खालील उदाहरणे सोडवा.

1. एका निवडणुकीत 13,47,048 स्त्रियांनी व 14,29,638 पुरुषांनी मतदान केले, तर एकूण मतदान किती झाले ?
2. सहा अंकी सर्वांत मोठी संख्या व सहा अंकी सर्वांत लहान संख्या यांची बेरीज किती येईल ?
3. सुरेखाताईंनी 8,07,957 रुपयांचा ट्रॅक्टर व 32,609 रुपयांचे मळणीयंत्र खरेदी केले, तर त्यांनी एकूण किती रुपये खर्च केले ?
4. एका गिरणीत मागील वर्षी 17,24,938 मीटर कापड तयार झाले. यावर्षी 23,47,056 मीटर कापड तयार झाले, तर दोन्ही वर्षांत मिळून किती कापड तयार झाले ?
5. राज्यशासनाने शाळांना 34,62,940 रुपयांचे संगणक व 3,26,578 रुपयांचे दूरदर्शनसंच दिले, तर शासनाने एकूण किती रुपयांचे साहित्य दिले ?

❐ **वजाबाकी – उजळणी**

पुढील उदाहरण अभ्यासा.

एका परीक्षेला मागील वर्षी 38,796 विद्यार्थी बसले. यावर्षी 47,528 विद्यार्थी बसले, तर यावर्षी परीक्षेला किती जास्त विद्यार्थी बसले ?

```
  4 7 5 2 8
- 3 8 7 9 6
-----------
  0 8 7 3 2
```

यावर्षी परीक्षेला 8,732 विद्यार्थी जास्त बसले.

येथे हातचे मनात धरून वजाबाकी केली आहे.

## Add.

### Problem Set 8

Add :

(1) 42,311 + 65,36,624
(2) 3,17,529 + 8,04,613
(3) 12,42,746 + 4,83,748
(4) 24,12,636 + 23,19,058
(5) 2,654 + 71,209 + 5,03,789
(6) 29 + 726 + 51,36,274
(7) 14,02,649 + 524 + 28,13,749
(8) 23,45,678 + 9,87,654
(9) 22 + 6,047 + 3,84,527
(10) 2,345 + 65,432 + 76,54,369

Study the following word problem.

- During the polio eradication campaign, 3,17,658 children were given the polio vaccine in one District and 2,04,969 children in another. Altogether, how many children got the vaccine ?

```
   3 1 7 6 5 8
 + 2 0 4 9 6 9
 -------------
   5 2 2 6 2 7
```

Altogether, 5,22,627 children got the vaccine.

### Problem Set 9

Solve the following problems.

1. In a certain election, 13,47,048 women and 14,29,638 men cast their votes. How many votes were polled altogether?
2. What will be the sum of the smallest and the largest six-digit numbers?
3. If Surekhatai bought a tractor for ₹ 8,07,957 and a thresher for ₹ 32,609, how much money did she spend altogether?
4. A textile mill produced 17,24,938 metres of cloth last year and 23,47,056 metres this year. What was the total production for the two years?
5. If the Government gave ₹ 34,62,950 worth of computers and ₹ 3,26,578 worth of TV sets to the schools, what is the total amount it spent on this equipment?

### Subtraction : Revision

Study the following example.

- Last year , 38,796 students took a certain exam. This year the number was 47,528. How many more students took the exam this year ?

```
   4 7 5 2 8
 - 3 8 7 9 6
 -----------
   0 8 7 3 2
```

8,732 more students took the exam this year.

## अर्थपूर्ण शब्दगट तयार करा..




- Name each picture and use it to make a meaningful phrase. Some useful words have been given.

प्रत्येक चित्र कशाचे आहे, ते सांगून अर्थपूर्ण शब्दगट तयार करा. काही उपयुक्त शब्द इथे दिले आहेत. 04

**Example :** an apple  'a big red sweet apple' 014

tall short little small big young old strong

long thin thick fat cold hot bright nice clean clever dirty soft hard



tasty round ripe juicy crunchy sweet shiny raw new dark violet pink yellow

beautiful black white red green blue golden

ही कृती वर्गात प्रथम तोंडी करून घ्यावी. शब्द तसेच शब्दगट (phrases) सांगताना मुले a/an चा योग्य वापर करतात ना ते पहावे. एकाने चित्राचे नाव व दुसऱ्याने त्याविषयी एखादा शब्द सांगायचा असा खेळही घेता येईल. उदा., A : Umbrella. B : Wet. 03

टेस्ट सोडवा

३.१ पृथ्वीची उत्पत्ती
३.२ पृथ्वीवरील सजीवांची निर्मिती
३.३ पृथ्वीवरील प्राणिसृष्टी

## ३.१ पृथ्वीची उत्पत्ती

आपणा सगळ्यांनाच काही प्रश्न पडतात. उदा., आपण सर्व ज्या पृथ्वीवर राहतो, ती पृथ्वी कशी घडली, केव्हा घडली? ती आता जशी आहे, तशी पहिल्यापासून होती की बदलली? ती बदलली असेल, तर तिच्यामध्ये नेमके कोणते बदल झाले?




पृथ्वी


शास्त्रीय संशोधनाच्या आधारे असे मानले जाते, की सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी अत्यंत तप्त वायू आणि धूळ यांनी मिळून बनलेला, एक प्रचंड मोठा गतिमान ढग अवकाशात निर्माण झाला. त्याच्या अत्यंत वेगवान, चक्राकार गतीमुळे त्याचे विभाजन होऊन सूर्य आणि सूर्याभोवती फिरणारे ग्रह निर्माण झाले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : १.बुध २.शुक्र ३.पृथ्वी ४.मंगळ ५.गुरू ६.शनी ७.युरेनस ८.नेपच्यून.

## ३.२ पृथ्वीवरील सजीवांची निर्मिती

या सर्व ग्रहांपैकी पृथ्वीवर सजीव सृष्टी आहे. पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर तिचा पृष्ठभाग थंड होऊन तिच्यावर जलाशयांची निर्मिती होण्यासाठी जवळजवळ ८० कोटी वर्षे लागली. असे मानले जाते, की पाण्यामध्ये प्रथम अनेक प्रकारचे एकपेशीय सजीव निर्माण झाले. 'आदिजीव' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या एकपेशीय सजीवांपासून हळूहळू बहुपेशीय सजीव निर्माण झाले. एकपेशीय सजीव अत्यंत सूक्ष्म असतात. ते नुसत्या डोळ्यांनी दिसत नाहीत. त्यांना पाहण्यासाठी सूक्ष्मदर्शकाची गरज असते.





सूक्ष्मदर्शकातून दिसणारा एकपेशीय सजीव



सूक्ष्मदर्शक

## देखो और सुनो ।























































**पढ़ो :** डर, फर, घर, रथ, शक, शरद, शहद, दशक, आदर, कहकर, अरहर, अशरफ, अटककर, आह, डाक, छाछ, थका, कथा, हरा, आशा, आका, काका, दादा, आहार, शारदा, शाकाहार, फटकार ।

- मुलांनो.. हा मुलगा तुम्हाला काहीतरी सांगत आहे. त्याचे जरूर ऐका बरं..

(व्हिडिओ पाहण्यासाठी चित्राला क्लिक करा.)




## घरी रहा...! सुरक्षित रहा...!



| माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून | | | | |
|---|---|---|---|---|
| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून... | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in